ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

# स्त्री संत: भक्ती आणि स्त्रीमुक्ती

*कीर्ती नारायणराव मार्डीकर,

* रिसर्च स्कॉलर, डीटीएसएस कॉलेज. मालाड (पूर्व).

**सारांश:**

*संतपरंपरेचा वारसा असणारा आपला महाराष्ट्र संतसाहित्याच्या वैभवाने समृद्ध आहे. अनेक प्रतिभासंपन्न संताच्या सहवासाने ही भूमी पावन झालेली आहे. भक्तिसंप्रदायामधे अनेक पुरूष संतांच्या बरोबरीने स्त्रीसंतानीही कार्य केले आहे. पण आज स्त्रीसंतांचे कार्य विस्मरणात गेल्यासारखे का वाटते? आपण स्त्रीसंतांकडे दुर्लक्ष करून एका मोठ्या ज्ञानभांडाराला आणि आनंदाला मुकतो आहोत का?*

***महत्त्वपूर्ण शब्द:*** *संतपरंपरा, स्त्रीसंत*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

प्रस्तावना:

संतांची भूमी असलेल्या आपल्या महाराष्ट्राला खूप मोठी संत परंपरा लाभली आहे. हे आपले अहोभाग्यच.

*ज्ञानदेवे रचिला पाया,*
*तुका झालासे कळस*

या संत परंपरेचा पाया ज्ञानदेवांनी घातला आणि तुकोबांनी कळस रचला असे म्हटले जाते. यादरम्यान होऊन गेलेल्या अनेक संतांनी केलेले प्रबोधनाचे काम तितकेच महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रात बाराव्या शतकात वारकरी संप्रदाय या भक्ती संप्रदायाची सुरुवात झाली. बाराव्या ते सतराव्या शतकादरम्यान वेगवेगळ्या संतांनी संत साहित्यामध्ये ओवी, अभंग, भारुड विराणी आणि पाळणा या रूपात अमोल भर घातली. संतांचे साहित्य समाजामध्ये अध्यात्मिक जागृती करत होते तसेच तत्कालीन सामाजिक प्रश्नांना वाचा ही फोडत होते. नैतिकता, अध्यात्म, समाजकारण, अस्पृश्यता, स्त्रियांवरील अत्याचार, राजधर्म अशा चौफेर विषयांवर संतांनी लिखाण केलेले आहे. संतांचे आराध्य 'विठ्ठल' हे सर्वसामान्य माणसांसारखे, मानव रूप होते त्यामुळे संतांनी विठ्ठलाला सखा, माऊली, राजा, पिता, बंधू, गुरु अशा सर्व रूपांत पाहिले.

संत म्हटले की काही नावे प्रामुख्याने समोर येतात ती म्हणजे संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत नामदेव इत्यादी होत. प्रामुख्याने घेतल्या जाणाऱ्या नावांमध्ये एकाही स्त्री संताचे जसे की संत मुक्ताबाई, जनाबाई, कान्होपात्रा, सखुबाई यांचे नाव का समोर येत नाही? त्यांचे काम पुरुष संतांच्या तुलनेत कोठेही कमी प्रतीचे नाही मग स्त्री संतांच्या वाट्याला हे दुर्लक्षितपण का यावे? संत परंपरेमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचं योगदान आहे पण तात्कालीन आणि आजच्या कर्मठ आणि पुरुषप्रधान

विचारांच्या पगड्यामुळे स्त्री संतांचे कार्य दुर्लक्षितच राहिले आहे असे सतत वाटते.

खरेतर सर्व स्त्री संत या विलक्षण धाडसी आणि सृजनशील होत्या. तत्कालीन परिस्थितीबरोबर जुळवून घेत प्रसंगी विरोध करत त्यांनी त्यांच्या आयुष्याचा अर्थ शोधायचा प्रयत्न केला. त्यांचे लिखाण त्यांच्या स्वतंत्र विचारशैलीचा आणि अनन्य भक्तीचा पुरावा नव्हे का?

**स्त्रीसंतांचे कार्य आणि स्त्रीमुक्ती संकल्पना :**

भक्तीच्या मार्गावर स्त्री आणि पुरुष हा भेदभाव नसतोच मुळी. भवसागरातून तरुन जाण्याची आणि विठोबाच्या पावली विलीन होण्याची इच्छा स्त्री आणि पुरुष संतांमध्ये तितकीच तीव्र होती. पण पुरुष संतांना ही इच्छा व्यक्त करण्याची आणि त्यासाठी प्रयत्न करण्याची जशी मोकळीक होती तशी ती स्त्री संतांना क्वचितच होती. पुरुष संतांनाही समाजाने विरोध केलाच पण स्त्री संतांना समाजाकडून आणि त्यांच्या घरातूनही प्रचंड विरोध झाला. कर्मठ सांस्कृतिक बंधनातून सुटण्यासाठी काही स्त्री संतांनी बंड ही केले. स्त्रीसंतसाहित्याने स्त्रियांची घरगुती कामे, मुलांचे भावविश्व, स्त्रियांचं भावविश्व, भक्ती यांची समाजाला दखल घ्यायला लावली. अन्यायकारक प्रथा आणि कुप्रथा, कर्मठ पितृसत्ताक संस्कृती यांमुळे मिळणारे, दुय्यम स्थान आणि जातीव्यवस्थेची जोखड ह्या सगळ्यां मधून विठ्ठल भक्तीचा ध्यासाने संतत्वाला पोचलेल्या काही स्त्री संतांबद्दल पाहूया.

संत जनाबाईला वयाच्या सातव्या वर्षीच वडील दमा यांनी संत नामदेवांच्या आईवडिलांकडे दासी म्हणून सुपूर्द केले होते. जनाबाई संत नामदेवांच्या घरी कामे करीत आणि तिथेच राहत असत. नामदेवांच्या घरच्या भक्तीपूर्ण वातावरणाचा प्रभाव जनाबाईंवरही पडला. संसार, प्रपंच, कुटुंब यांसारख्या गोष्टीतले प्रेम त्या विठ्ठल भक्ती मध्ये शोधू लागल्या. यांच्या कविता, अभंग एका वेगळ्याच अनुभूतीचा साक्षात्कार घडवीत होते. जनाबाईंनी अवघे तीनशे पन्नास अभंग रचले तेही कोणतेही शिक्षण नसताना केवळ प्रतिभा आणि अनन्य विठ्ठल भक्ती च्या जोरावर. अतिशय कष्टाचे जीवन केवळ विठ्ठल भक्तीच्या जोरावर जनाबाईंनी सुखकर केले. या अभंगातून जनाबाई तिचे आणि विठ्ठलाचे अतूट नाते सांगते, स्त्रीमनाचे, मातृ हृदयाचे दर्शन घडवते, प्रसंगी अभंगातून बंडखोरी ही डोकावते. ही बंडखोरी म्हणजे स्त्री-पुरुष समानतेचा आविष्कार होय. 'विठू माझा लेकुरवाळा' या रुपकात्मक अभंगातून तर सर्व जातीधर्मांच्या संतांना एकत्र आणून विठ्ठलाच्या अंगाखांद्यावर खेळवते.

संत मुक्ताबाई ही संत ज्ञानेश्वर यांची धाकटी बहीण पण तिची अध्यात्मिक योग्यता ज्ञानदेवांएवढीच होती. तीं योगिनी होती. ताटीचे अभंग, कल्याणपत्रिका, नमन इत्यादी बऱ्याच रचना मुक्ताबाईने रचल्या आहेत. समाजाच्या छळाने अपमानित आणि दुःखी होऊन मनाची दारे बंद करून बसलेल्या ज्ञानदेवांना आईच्या अधिकाराने मुक्ताबाईने ताटीच्या अभंगाद्वारे समजावले. संत श्रेष्ठ नामदेवाला ही 'अखंड ज्याला देवाचा शेजार, कारे अहंकार नाही गेला' असे ठणकावून नामदेवांच्या ठाई अहंकार आहे हे दाखवून दिले. चांगदेवांना लहान मूल मानून त्यांना मार्गदर्शन केले. अशा प्रकारे धर्मप्रबोधनाच्या बाबतीत मुक्ताबाईचे योगदान किती थोर आहे हे कळते. ज्या काळात स्त्रियांना वेदबंदी होती त्याकाळात मुक्ताबाईचा अध्यात्मिक विकास हा तत्कालीन अध्यात्मिक क्षेत्रातील

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

**स्त्रीमुक्तीचा एक अविष्कारच नव्हे का**?

संत नामदेवांच्या परिवारातील जवळ-जवळ सर्वच स्त्रियांनी अभंग रचना केली आहे. त्यांच्या घराण्यात असणारे अध्यात्मिक वातावरण आणि संत नामदेवांचा सहवास यामुळे ह्या स्त्रियांची प्रतिभा चांगलीच बहरली होती. रोजच्या संसारिक जीवनाचे कष्ट आणि विठ्ठल भक्ती यांचा समावेश ह्या अभंगांमध्ये होता.

वारकरी पंथाच्या संत परंपरेमध्ये असेच एक महत्त्वाचे स्थान आहे संत कान्होपात्राचे. कान्होपात्रा ही मंगळवेढ्यातील नायकिणीची मुलगी, अतिशय रूपवान होती. परंपरेनुसार नायकिणीचे काम करण्याऐवजी कान्होपात्रेने अंत:स्फूर्तीने विठ्ठल भक्तीचा मार्ग निवडला. विठ्ठलाच्या ओढीने पंढरपूरात येऊन विठ्ठल भक्तीत लीन झालेल्या कान्होपात्रेने आपल्या व्यवसायाचा निषेध केला. स्त्रीदेहाच्या विटंबनेचे आणि पराधीनतेचे दुःख कान्होपात्रेच्या नशिबी आले होते. बिदरच्या बादशहा कडून कान्होपात्रेला मागणी आली होती आणि तीं न गेल्यामुळे तिला पकडून देण्यासाठी बादशहाचे सैनिक आले तेव्हा तीं कळकळीने विठ्ठलाला विनंती करते,-

*'नको देवराया अंत असा पाहू, प्राण हा सर्वथा फुटो पाहे,*

*हरिणीचे पाडस व्याघ्रे धरीयेले, मजलागी जाहले तैसे देवा.'*

या विनंतीनंतर विठ्ठल चरणी कान्होपात्रा देह अर्पण करते. परंपरेने आलेला गणिका हा पेशा नाकारून कान्होपात्रा आपल्या परीने जीवन जगते. त्या काळातील तिची बंडखोरी ही स्त्रीमुक्तीचे प्रतीक नव्हे का?

**निष्कर्ष :**

ह्या आणि अशा बऱ्याच स्त्री संतांनी त्यांना नाकारलेला अध्यात्मिक मार्ग अवलंबून त्यावर यशस्वी वाटचालही करून दाखवली आहे. स्त्री संतांनी स्वकर्तृत्वाने समाजात प्रतिष्ठा मिळवली. त्यांच्या एकाकी आणि दुःखी जीवनात विठ्ठल भक्तीचा आसरा शोधला. लिंगभेदाच्या पारंपारिक संकल्पना सोडून पुरूष संतांच्या बरोबर भजन, किर्तन, तीर्थयात्रा, संवादांचा लाभ घेतला. काही स्त्रीसंतांनी संसार बंधनांच्या पलीकडे जाऊन जीवनाचा आनंद भक्तीच्या माध्यमातून उपभोगला. 'स्त्री जन्म म्हणून न व्हावे उदास' हा संदेश समाजातल्या पीडित स्त्रियांना स्त्री संतांनी दिला. मोलाचे कार्य करून गेलेल्या या स्त्री संतांकडे समाजाने केलेले दुर्लक्ष क्षमा करण्याजोगे आहे का? काय वाटते तुम्हाला?

**आधार ग्रंथ:**

➢ आजगांवकर ज. रा., महाराष्ट्र संत-कवयित्री, 1939.

➢ आवटे श्रीसकलसंतगाथा: भाग-1, 2, संपादक: का. अ. जोशी-, 1964.

➢ निवडक सकल संत सार्थ गाथा, सकल प्रकाशन जानेवारी 2018.

➢ शेवडे, इंदुमती, संत कवयित्री, पॉप्युलर प्रकाशन, 1989.

➢ मोरे सदानंद, ताटीचे अभंग- एक विवेचन, श्री भागवत प्रबोधन संस्था प्रकाशन, श्री क्षेत्र देहू 1994.

➢ संपादक मोहिते शिवाजीराव निवृत्ती, सकल स्त्री संत गाथा, पार्थ प्रकाशन, **2021.**

➢ संपादक तांदळे, ज्ञानेश्वर, श्रीज्ञानेश्वरी, अमोल प्रकाशन पुणे, **2019,**

**Cite This Article:**

***कीर्ती नारायणराव मार्डीकर,*** *(2022)* स्त्री संत: भक्ती आणि स्त्रीमुक्ती , ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 150-153.*